**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १७३/२०२४ निशाणी क्र. १८ व १९**
**वरील संयुक्तीक आदेश**
**( दि. ०६.०१.२०२६ रोजी पारीत )**

अर्ज निशाणी १८ फिर्यादी तर्फे आरोपी विरुध्द जामीनपात्र वारंट काढण्यासाठी दिलेला असून निशाणी क्र. १९ आरोपी तर्फे हजरी माफ करण्यासाठी दिलेला आहे.

२. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, आरोपी दि. २३.१०.२०२४ रोजी प्रकरणात हजर झाला असून प्रकरण दि. २३.१०.२०२४ पासुन आरोपीचे प्रतिकथन नोंदवण्यासाठी प्रलंबीत आहे. त्यानंतर झालेल्या तारखेस आरोपी गैरहजर असल्याचे रोजनाम्यावरुन दिसत आहे. दि. २३.०६.२०२५ रोजी आरोपी विरुध्द वॉरंट काढण्यात आले होते. दि. १९.०८.२०२५ रोजी आरोपीने हजर होवून सदरचे वॉरंट रद्द करुन प्रकरण मध्यस्थी केंद्राकडे पाठवण्याची विनंती केली. त्यावरुन प्रकरण मध्यस्थी केंद्राकडे पाठवण्यात आले. परंतू आरोपी त्यादिवशी गैरहजर असल्यामुळे मध्यस्थी झालेली नाही. सबब अभिलेखावरुन दिसून येते की, प्रस्तूतचे प्रकरण मागील एक वर्षापासून आरोपीचे प्रतिकथन नोंदवण्यासाठी प्रलंबीत आहे. अर्ज निशाणी १९ मध्ये कारण संयुक्तीक दिसून येत नाही. सबब अर्ज निशाणी १९ नामंजूर करण्यात येतो व अर्ज निशाणी १८ अन्वये आरोपी विरुध्द रक्कम रुपये ५ हजार चे जामीन पात्र वॉरंट काढण्यात यावे.

MAHESH ARVINDRAO KULKARNI
Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2026.01.07 10:51:32 +0530

**दिनांक: ०६.०१.२०२६** **( एम.ए.कुलकर्णी )**

**ठिकाण: कवठेमहांकाळ** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**

**कवठेमहांकाळ**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original order / judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Mrs. J. A. Salunkhe.<br>(Stenographar grade - III) |
| Court | : | Jt. C.J.J.D. and J.M.F.C.,<br>Kavathe Mahankal. |
| Date | : | 06.01.2026 |
| Order /judgment signed by P.O. on | : | 06.01.2026 |
| Order /judgment uploaded on | : | 07.01.2026 |